## नि.दि.दावा क्र.२९०/२०१८ मधील अर्ज नि.क्र.४७ वरील आदेश

प्रस्तुतच्या अर्जाअन्वये प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांची कैफियत व म्हणणे कामी समाविष्ट करून घेणेबाबत विनंती केली आहे. प्रतिवादीचा नि.४७ वरील अर्ज व वादीने सदर अर्जास दिलेले म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र.१ यांच्या अर्जामधील कथन असे की, प्रतिवादी क्र.१ यांच्या आजारपणामुळे व कागदपत्रांची पूर्तता वेळेत उपलब्ध न झाल्याने त्यांना त्यांची कैफियत व म्हणणे वेळेत दाखल करता आले नाही. दरम्यानच्या काळात उभयतांमध्ये तडजोडीची बोलणी चालू होती व प्रकरण मेडीएशनकरिता नेमण्यात आले होते. सदरचे काम लोकअदालतमध्ये ही ठेवण्यात आले आहे. तसेच प्रतिवादीचे जवळचे नातेवाईक मयत झाल्याने त्यांना वेळेत म्हणणे व कैफियत देता आली नाही. सदरचा झालेला विलंब प्रतिवादी यांनी जाणुनबुजून केलेला नाही. प्रतिवादीची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांचे पैशात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांची कैफियत व म्हणणे प्रस्तुत कामी समाविष्ट करून घेणेबाबत विनंती केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे. अर्जातील सर्व कथने खोटी, काल्पनिक व रचनात्मक आहेत. प्रतिवादीला अनेक वेळा मुदत देवूनही त्यांनी त्यांचे म्हणणे व कैफियत वेळेत दाखल केलेले नाहीत. अर्जातील कारण योग्य नाही. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी यांनी केवळ वादींना न्याय मिळू नये म्हणून वेळेत कैफियत दाखल केलेली नाही. सबब, वादीने अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्जामधील कथने प्रतिवादी क्र.१ यांनी शपथेवर सांगितलेली आहेत. प्रतिवादी क्र.१ यांना दाव्यात कैफियत दाखल करण्यास बराच विलंब झालेला

आहे. प्रतिवादीच्या आजारपणामुळे व कागदपत्रांची पुर्तता वेळेत न झाल्याने तसेच त्यांचे जवळचे नातेवाईक मयत झाल्याने सदरचा विलंब झाल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.१ यांनी शपथेवर कथन केलेले असले तरी ते संयुक्तीक वाटत नाही. परंतु दावा हा सरस–निरस मानाने तुटक वाटप होऊन कब्जा व निरंतर मनाईकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर आलेस वादींचे कसलेही नुकसान होणार नाही. नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून प्रतिवादी क्र.१ यांची कैफियत स्वीकारणे आवश्यक आहे. परंतु प्रतिवादीच्या विलंबामुळे दावेचे कामकाज लांबणीवर पडलेने प्रतिवादी क्र.१ यांचा अर्ज रक्कम रु.२००/– चा खर्च भरणेच्या अटीवर मंजूर करणे मला न्यायाचे वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.१ यांचा अर्ज रक्कम रु.२००/– (अक्षरी रु.दोनशे मात्र) चा खर्च भरणेच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

Digitally signed by Swati Bhaskar Naiknavare
Date: 2021.03.18 17:37:50 +0530

मिरज. ( स्वाती भा. नाईकनवरे–गरड )

दि. १७/०३/२०२१ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज

## नि.दि.दावा क्र.२९०/२०१८ मधील अर्ज नि.क्र.४९ वरील आदेश

प्रस्तुतच्या अर्जाअन्वये प्रतिवादी क्र.१० यांनी त्यांची कैफियत व म्हणणे कामी समाविष्ट करून घेणेबाबत विनंती केली आहे. प्रतिवादीचा नि.४९ वरील अर्ज व वादीने सदर अर्जास दिलेले म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र.१० यांच्या अर्जामधील कथन असे की, प्रतिवादी क्र.१ यांच्या आजारपणामुळे व कागदपत्रांची पूर्तता वेळेत उपलब्ध न झाल्याने त्यांना त्यांची कैफियत व म्हणणे वेळेत दाखल करता आले नाही. दरम्यानच्या काळात उभयतांमध्ये तडजोडीची बोलणी चालू होती व प्रकरण मेडीएशनकरिता नेमण्यात आले होते. सदरचे काम लोकअदालतमध्ये ही ठेवण्यात आले आहे. तसेच प्रतिवादीचा पूतण्याचे अकस्मित निधन झाल्याने त्यांना वेळेत म्हणणे व कैफियत देता आली नाही. सदरचा झालेला विलंब प्रतिवादी यांनी जाणुनबुजून केलेला नाही. प्रतिवादीची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांचे पैशात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांची कैफियत व म्हणणे प्रस्तुत कामी समाविष्ट करून घेणेबाबत विनंती केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे. प्रतिवादी क्र.१ व १० यांनी संगणमताने करार करुन वादीचा हिस्सा बळकवण्याचा प्रयत्न केला आहे. प्रतिवादी क्र.१० यांनी दिलेले कारण संयुक्तीक नाही व विलंबाबाबत तपशिलवार माहिती दिलेली नाही. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी यांनी केवळ वादींना न्याय मिळू नये म्हणून वेळेत कैफियत दाखल केलेली नाही. सबब, वादीने अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्जामधील कथने प्रतिवादी क्र.१० यांनी शपथेवर सांगितलेली आहेत. प्रतिवादी क्र.१० यांना दाव्यात कैफियत दाखल करण्यास बराच विलंब झालेला

आहे. प्रतिवादीच्या आजारपणामुळे व कागदपत्रांची पुर्तता वेळेत न झाल्याने तसेच त्यांच्या पुतण्याचे अकस्मित निधन झाल्याने सदरचा विलंब झाल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.१० यांनी शपथेवर कथन केलेले असले तरी ते संयुक्तीक वाटत नाही. परंतु दावा हा सरस–निरस मानाने तुटक वाटप होऊन कब्जा व निरंतर मनाईकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर आलेस वादींचे कसलेही नुकसान होणार नाही. नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून प्रतिवादी क्र.१ यांची कैफियत स्वीकारणे आवश्यक आहे. परंतु प्रतिवादीच्या विलंबामुळे दावेचे कामकाज लांबणीवर पडलेने प्रतिवादी क्र.१० यांचा अर्ज रक्कम रु.२००/– चा खर्च भरणेच्या अटीवर मंजूर करणे मला न्यायाचे वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.१० यांचा अर्ज रक्कम रु.२००/– (अक्षरी रु.दोनशे मात्र) चा खर्च भरणेच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

Digitally signed by Swati Bhaskar Naiknavare
Date: 2021.03.18 17:38:11 +0530

मिरज. ( स्वाती भा. नाईकनवरे–गरड )

दि. १७/०३/२०२१ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज

<u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | K. A. Udagave (L.G.) |
| Court. | : | Civil Judge,Jr.Dn.,Miraj |
| Date. | : | 17.03.02021. |
| Judgment/order signed by the Presiding Officer on. | : | 17.03.02021. |
| Judgment uploaded on. | : | 19.03.02021. |